**क्रमांक : ९-अ**

**महाराष्ट्र विधानसभा**

**पत्रक भाग दोन**

**सोमवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४/ फाल्गुन ७, १९४५ (शके)**

**९-अ. सन २०२४-२०२५ च्या अंतरिम अर्थसंकल्पीय प्रकाशनांचा पेनड्राईव्ह असलेल्या सुटकेसेसचे वितरण**

विधानसभेच्या सर्व सन्मा.सदस्यांना कळविण्यात येते की, सन २०२४-२०२५ च्या अंतरिम अर्थसंकल्पीय प्रकाशनांचा पेनड्राईव्ह असलेल्या सुटकेसेसचे टोकन्स **मा.सदस्यांना मंगळवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ रोजी हजेरीपटावर स्वाक्षरी करतांना व तद्नंतर बुधवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२४ पासून अधिवेशन संस्थगित होईपर्यंत "ड-३" (अंदाज समिती), कक्ष क्रमांक १२०२, बारावा मजला, विधान भवन, मुंबई** येथे देण्यात येतील. सन्मा.सदस्यांनी सदर टोकन्स खालील वितरणाच्या ठिकाणी जमा केल्यानंतर अर्थसंकल्पीय प्रकाशनांचे पेनड्राईव्ह असलेल्या सुटकेसेस त्यांना वितरीत करण्यात येतील.

| अ.क्र.<br>(१) | वार व दिनांक<br>(२) | अर्थसंकल्पीय प्रकाशनांचा पेनड्राईव्ह असलेल्या सुटकेस वितरणाचा कालावधी<br>(३) | ठिकाण<br>(४) |
|---|---|---|---|
| १. | मंगळवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ | अर्थसंकल्पावरील मा.उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांचे भाषण संपल्यानंतर | विधान भवन करीता आरक्षित असणाऱ्या वाहनतळाच्या मोकळया जागेवर उभारण्यात आलेल्या मंडपामध्ये, विधान भवन, मुंबई |
| २. | बुधवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२४ पासून अधिवेशन संस्थगित होईपर्यंत | सकाळी १०.३० ते सायंकाळी ६.३० वाजेपर्यंत | विधान भवन गोल इमारत, दालन क्र. ४ (अ), चौथा मजला, विधान भवन, मुंबई |

सर्व सन्मा.सदस्यांना कळविण्यात येते की, अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर अर्थसंकल्पीय प्रकाशनांचा पेनड्राईव्ह असलेली सुटकेस त्यांनी कृपया लवकरात लवकर प्राप्त करुन घ्यावी.

मा.मंत्री यांच्या खाजगी सचिवांनी उपरोक्त टोकन्स तसेच अर्थसंकल्पीय प्रकाशनांचा पेनड्राईव्ह असलेली सुटकेस नेण्याची व्यवस्था करावी.

---

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २६ फेब्रुवारी, २०२४

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा

**याची प्रत :**

१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्मा.सदस्य ( मंत्री महोदयांसह )

२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.

३) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.